***याशिवाय ज्यांना लागु आहे त्यांनी खालील कागदपत्रेही***

**दाखल करणे आवश्यक.**

* दांम्पत्याला स्वत: जन्म दिलेले अथवा दत्तक घेतलेले मुल/मुले पुरेशी मोठ्या वयाची असल्यास त्यांनी त्यांची संमती देणे आवश्यक.
* दांम्पत्याला पूर्वी दत्तक घेतलेले मुल/मुले असल्यास दत्तक आदेशाची प्रत.
* दांम्पत्यापैकी कुणाचा या विवाहापूर्वी घटस्फोट झाला असल्यास त्या आदेशाची प्रत.

सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती ओरीजनल कागदपत्रांसोबत पडताळुन पाहण्यात येतील. वरील कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर इतर कागदपत्रांची पूर्तता संस्थेने व दत्तकेच्छुक दांम्पत्याने एकत्र करावयाची असते. कागदपत्रांचा संच पूर्ण झाल्यावर गृहचौकशी अहवाल (होमस्टडी) होणे अत्यंत जरुरी आहे. गृहचौकशी अहवाल झाल्यानंतर जसे बाळ संस्थेत असतील त्याप्रमाणे, प्रतीक्षायादी प्रमाणे दत्तकेच्छूक पालकांना बाळ घेण्याकरीता बोलविण्यात येते. एक वर्ष वयापर्यंतचे बाळ द्यावयाचे असल्यास दत्तकेच्छूक दांम्पत्याच्या वयाची बेरीज ८५ पेक्षा जास्त नको.

## गृहचौकशी अहवाल –

दत्तक घेण्यासंबंधीचा निर्णय पक्का झाला की, संस्थेची समाज कार्यकर्ती तुमच्या घरी भेट देते. यात संयुक्त, वैयक्तिक मुलाखती होतात. शंकाचे निरसन केले जाते. दांम्पत्याची, मुल दत्तक घेण्यामागची प्रेरणा तपासली जाते. कुटूंबाची सामाजीक पार्श्वभुमी जाणून घेतली जाते.

## आपलं मुल निवडतांना –

आपलं मुल कसं असावं या विषयी काही कल्पना दत्तकेच्छूक पालकांच्या मनात घर करुन असतात. त्या तुमच्या अपेक्षा, कल्पना सामाजीक कार्यकर्त्यांना तुम्ही सांगायला हव्यात. म्हणजे तुमच्या कल्पनांशी मिळतं जुळतं बालक तुम्हाला दाखवता येईल. परंतु एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, प्रत्येकच बाळ गोंडस, गुटगुटीत असेलच असे नाही. आपल्याला साजेशी ३ मुलं आपणास दाखविण्यात येतील. त्यातूनच एक मुल आपणास निवडायचे आहे.

एका वेळी एकच मुल बघा, म्हणजे निवड करतांना गोंधळ होणार नाही. मुलांच्या स्वास्था विषयी तुम्हाला सांगण्यात येईल. परंतू मुलाच्या जन्मदात्यांविषयीच्या माहितीबद्दल गुप्तता पाळण्यात येईल. मुल घरी नेण्यापूर्वी आपल्या बालरोग तज्ञाचा सल्ला घ्या. अस आग्रहान सांगण्यात येतं.

## दत्तक घेतलेलं बालक कायदेशीरपणे तुमच होते का ? होय

कायद्यानुसार आपणाला मुलगा/मुलगी दत्तक घेता येईल. कायदा दत्तक मुलांना जैविक मुलांचे संपूर्ण हक्क प्रदान करतो. कायद्याप्रमाणे मुलाला कुटूंबात नैसर्गिक रित्या जन्मलेल्या मुलाचे संपूर्ण कायदेशीर स्थान मिळते. मुलाच्या आर्थिक सुरक्षीततेसाठी पाल्याच्या नावे विशिष्ट रकमेची गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

तुमची दत्तक विधानाची केस दिवाणी न्यायालयातर्फे किंवा जिल्हा न्यायालयातर्फे हाताळली जाईल. याशिवाय प्रत्येक संस्थेचे दत्तकविषयक तज्ञ असे स्वत:चे वकील असतात. त्यांच्याद्वारे न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केली जाते.